***"यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?"***

अलोक-सामान्य-श्रेष्ठ साहित्यिक

# पद्मभूषण विष्णू सखाराम खांडेकर

(ज्यांचेमुळे मराठी भाषेला प्रथमच ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला.)

जन्म : ११/०१/१८९८ - सांगली * मृत्यू - ०२/०९/१९७६ - सांगली

मराठी भाषेमध्ये प्रसिद्ध झालेल्या साहित्यकृतींपैकी सर्वोत्कृष्ट साहित्यकृती म्हणून 'ययाती' या कादंबरीचा उल्लेख होऊन दिला गेलेला ज्ञानपीठ पुरस्कार ! कोणत्याही प्रकारचा पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्याची प्रक्रिया चालू असताना ज्यांच्यावर किंवा ज्यांच्या लिखाणावर कौतुकाचा वर्षाव प्रसिद्ध झालेला नसतानाही, आतापर्यंत दिले गेलेले ज्ञानपीठ पुरस्कार-प्राप्त लोक तेवढेसे योग्य नव्हते अशा प्रकारचे लिखाण छापवून आणलेले नसतानाही, निर्णय घेणाऱ्या सभासदांवर कोणताही दबाव नसताना दिला गेलेला पुरस्कार ! असे खांडेकरांच्या १९७६ साली मिळालेल्या ज्ञानपीठ पुरस्काराचे वर्णन करता येईल. खांडेकर ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे पहिले मराठी साहित्यिक ! कथा-कादंबरी-काव्य-नाटक-पटकथा-समीक्षा-विनोद-व्यक्तिचित्रे अशा अनेक साहित्य प्रकारात त्यांनी विपुल साहित्यनिर्मिती केली.

१९५२ साली 'शामची आई' या चित्रपटासाठी आचार्य अत्रे यांना भारत सरकारचे पहिले सुवर्णपदक मिळाले; त्यावेळी अत्रे यांना एकाने हा पुरस्कार तुम्हाला कसा काय मिळाला असे विचारले होते. तेव्हा ते म्हणाले होते की, 'बहुधा तो निर्णय घेणाऱ्या कमिटीवर एकही महाराष्ट्रियन नसावा.' ... तसाच प्रकार खांडेकरांच्या बाबतीतही घडला असावा असे वाटते. ही निर्णय प्रक्रिया काय व कशी असते याची माहिती असल्यामुळे; खांडेकरांचे नाव त्या वर्षाच्या अखिल भारतातून निवडलेल्या सर्वोत्कृष्ट साहित्यासाठी दिल्या जाणाऱ्या 'ज्ञानपीठा'साठी निश्चित करणाऱ्या ज्ञानपीठ पारितोषिक समितीच्या सभासदांच्या न्याय्य, निःपक्षपाती विचक्षण बुद्धीचे नेहमीच कौतुक वाटते.

पुढच्या अनेक पिढ्यांना विष्णू सखाराम खांडेकर, यांचे एका, आपल्या सर्व उत्तम परंपरांवर, सद्‌गुणांवर, श्रद्धा असलेल्या, जिव्हाळा असलेल्या, मानवी जीवनावर निरतिशय प्रेम करणाऱ्या, एकदम साध्या-सरळ स्वभावाच्या, भव्य आणि पारदर्शी व्यक्तिमत्त्वाच्या, उच्च दर्जाचं परसंवेदन असलेल्या सहृदय सम्राटाचे नाव, उत्तम वैचारिकतेला जोजावणारं सळाळतं चैतन्य देत राहील. तामीळनाडूमध्ये काहींनी आपल्या मुलांची नावे 'खांडेकर' अशी ठेवलेली मी वृत्तपत्रांमध्ये वाचली. दुसऱ्या अनेकानेक व्यक्तींमध्ये सद्‌गुणांचे सुंदर रोपटे जगवणाऱ्या या मराठी सरस्वती-पुत्राचे हे एक आदरयुक्त असे, सार्वजनीन स्वरूपात भावलेले कौतुक आहे. अनेक कऱ्हाडा व्यक्तींप्रमाणे खांडेकरांवरही भारत सरकारने पोस्टाचा स्टँप काढला होता. भारत सरकारने १९६८ साली त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरविले. १९७० मध्ये साहित्य अकादमीने त्यांना फेलोशिप देऊन गौरविले. १९७६ साली सर्वोत्कृष्ट साहित्यासाठी दिला जाणार 'ज्ञानपीठ' पुरस्कार त्यांना मिळाला. शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी.लिट्. दिली.

खांडेकरांविषयी बोलताना त्यांना 'जीवनवादी साहित्यिक ' असे म्हणण्यात येते. कलेसाठी कला

म्हणणारे आणि जीवनासाठी कला असे म्हणणारे अशा दोन विभागांत साहित्यिकांची वाटणी झालेली दिसते. माणसानं निर्माण केलेल्या कलेसह सर्व गोष्टी माणसासाठीच आहेत. 'अ'साठी 'ब' असे ज्यावेळी आपण म्हणतो त्यावेळी 'ब'कडे गौणत्व येते. बहुरंगी-बहुआयामी-बहुपेडी असे मानवी जीवन की जे सदैव बदलते असते; तेच खांडेकरांच्या सदैव चिंतनाचा विषय असे. परस्परांना अनेकदा छेद जाणारे, अनेक ठिकाणी विचित्र वाटणारे दोन माणसांच्या जवळ येण्यातून निर्माण होणारे चित्र-विचित्र मानवी संबंध हा खूप नाजूक मनाने समजून घेण्याचा विषय आहे. माणसाची कृती मानव-सापेक्ष आहे; म्हणूनच तिच्यात तरतम भाव आहे. किंबहुना जीवनात सर्व काही सापेक्षच आहे. निरपेक्ष किंवा ॲब्सोल्यूट असे काहीही नाही. जीवनातला अर्थ शोधताना तो कलेच्या आधाराने शोधायला कला मदत करते. कलानिर्मिती ही एक मानवी क्रिया आहे. प्रत्येक क्रियेला (मानवी) हेतू असतो. आणि हा हेतू, मानवाला त्या त्या प्रश्नाची उत्तरे शोधायला सोपं जावं हा असतो. मानवी जीवनाला उपयोगी पडणारा विचार दुसऱ्या माणसापर्यंत पोहोचविणे हा त्यात हेतू असतो.

कवी किंवा साहित्यिकासाठी संस्कृतमध्ये 'मनीषी' म्हणजे चिंतनशील व्यक्ती हा शब्द आलाय. चिंतनशील व्यक्तीच्या निरामय व हितकारक विचारांना, सर्वसामान्य व्यक्तींनी झटकन स्वीकारावे याकरिता कला काम करते. म्हणजे अशा विचारांना स्वीकार्य बनविण्याचे काम कला करते आणि त्यासाठीच ती हवी आहे. म्हणजे विचार, स्वीकार्य बनविण्याचे कला हे साधन आहे, साध्य नव्हे. नेहमीकरिताच स्वतःच्या वस्तुनिष्ठ विचारांवर आधारित, तर्कपूत विचारसरणीने त्या विचारांतले दोष घालविलेले चिंतनच, माणसामध्ये अंतःकरणाची श्रीमंती अधिकाधिक आणते; आणि हाच व्यक्तीचा खरा विकास असतो व आहे. अशा विचारांची स्वीकार्यता वाढविण्यापुरतचा कलेचा उपयोग असतो. म्हणूनच थोड्या काळासाठी भावना चालविण्याकरिता नव्हे तर कोणत्याही देशात कोणत्याही काळात साहित्याचा वा कलांचा त्या देशातील नागरिकांचे सांस्कृतिक वैचारिक स्थान उंचावण्याला किती उपयोग झाला यावर या गोष्टीला महत्त्व आहे; आणि तरच खांडेकर हे जीवनवादी साहित्यिक होते या म्हणण्यातला अर्थ कळेल.

खांडेकर 'लेखकु' नव्हते ते साहित्याचे मर्म जाणणारे मर्मज्ञ, मनीषी आणि चिंतनशील व्यक्तिमत्त्व होते. आज आपल्याला लेखकांचे जे ग्रूप्स किंवा टोळी दिसते तशा टोळ्या ज्यांनी कधीच केल्या नाहीत, ज्यांना कराव्या लागल्या नाहीत असे खांडेकर होते. असे खरे साहित्यिक फार विरळा असतात. भा. रा. तांबे, मोरोपंत, माडखोलकर, दुर्गा भागवत, इंदिरा संत, साधले, सुरेश भट, बालकवी, अनन्त शेवडे, मर्ढेकर, वसंत कानेटकर, य. दि. पेंढारकर, काटदरे, सुधीर मोघे, आनंद यादव यांचेसारखे स्वयंभू साहित्यिक कोणत्याच ग्रूपच्या टोळी कल्चरमधे सामील झालेले दिसत नाहीत. अशा टोळ्यांचे ते-ते साहित्यिक टार्गेट मात्र होते.

खांडेकरांची ओळख मराठीतले पहिले लघुनिबंधकार अशी असताना बऱ्याचदा छुप्या रीतीने व कधी उघड, ना. सी. फडके यांचे नाव त्या ठिकाणी घ्यायचे. प्रोफेसर आनंद यादव यांनी २५.१.१९९७ च्या आपल्या 'सकाळ' मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखामध्ये वि. स. खांडेकरच पहिले मराठी लघुनिबंधकार हे ठासून सांगितले आहे.

या बाबतीत मराठी साहित्याले विचारवंतांचे क्वचित स्वतःच्या मतालाही विरोध करणारे लिखाण आठवते. ज्या कोल्हटकरांनी ना. सी. फडके यांना 'युगपुरुष साहित्यिक' म्हणून गौरविले,

त्यांनीच नंतर 'सोबत' मध्ये लेखमाला लिहून ना. सी. फडके एक व्यक्ती किंवा साहित्यिक म्हणूनही तसे नव्हतेच हे सिद्ध केले. ग. त्र्यं माडखोलकरांनी केशवसुतांचे, नागपूरच्या तरुण भारतमधे कौतुक केले व नंतर स्वतःचेच ते मत खोडून काढले ..... खरेच, मराठी साहित्याच्या इतिहासात या गोष्टींची एक विशेष गुण म्हणून नोंद व्हायला हवी.

या घाणेरडे राजकारण सांगणाऱ्या गोष्टी की ज्यांचेवर त्या कवीचे खरे स्थान किंवा साहित्यिकाची स्वीकार्यता, मान्यता आणि त्या कवीचे 'कवी' म्हणून नाव किंवा त्याचे काव्य किती वर्षे त्या भागात जिवंत राहिले या गोष्टी अवलंबूनच नाहीत. तरीही या गोष्टींमुळे सांस्कृतिक विश्वाची नकारात्मक बाजू कोणत्या कारणांमुळे संस्कृतीमधे रेंगाळत असते ते समजते. माणसांच्या अनुभूतींना सुलभ असे आणि सर्वच लोकांना सारखेपणाने लावता येणारे, तर्कावर आधारलेले निकष आपण, एखाद्या दुष्टतेचे व्रत घेतलेल्या व्यक्तीसारखे दुष्ट युक्त्यांमुळे नव्हे तर खऱ्या सहृदय आणि रसिकमान्य युक्त्यांचा वापर करून लावले तर कवी म्हणून जन्माला आलेले खरेखुरे स्वयंभू मोठे आणि माध्यमातील युक्त्यांचा वापर करून मोठे केलेले तथाकथित साहित्यिक वेगळे करता येतात; आणि ज्यांचे सांस्कृतिक वातावरणाला फार मोठ्या काळासाठी सतत विचारांचे आदर्श म्हणून अनुसरण होत आले असे वामन पंडित, संत ज्ञानेश्वर, संत रामदास, संत तुकाराम, मोरोपंत यांच्यासारख्यांचेच विचार त्यांच्या रचनांच्या अभ्यासासह आणि विचारांसह अनुसरण्यात आले. आधुनिक मराठी साहित्यात आलेल्या विचारांमध्ये, या आधी वर दिलेल्या लोकांचेच अनुसरण सतत होत राहिले; त्याची कारणे आपण नीट समजून घेऊया. चांगल्याला अनुल्लेखाने मारून, पायदळी तुडविण्याच्या अनेक दुष्ट युक्त्या जरी अनुसरल्या तरी समाजामधे, चांगल्या विचारांचाच परिणाम दीर्घकाळ राहतो आणि चांगल्याला वाईट ठरविणारे वाईट किंवा रावण-मंबाजीसारखे दुर्लक्षणीच व्यक्ती ठरतात.

विष्णू सखाराम खांडेकर यांनी आमच्यामधे जीवनात उत्तम विचार संपन्नतेने जगण्याची आशावादी दृष्टी निर्माण केली. आमच्या साऱ्या दोषांकडेही पहाण्याची मान त्याच्या बैठकीवर आधारलेली संताला शोभणारी दृष्टी दिली. तात्पुरत्या, थोडा वेळ टिकणाऱ्या चंचल भावनांना न कवटाळता खरे-खुरे मानवतेला जवळ करणारे, दीर्घ जीवी, उदात्त, श्रेष्ठ आणि माणसाला आतूनच सर्व काळाकरता मोठा करणारे करुणा, दया, आपुलकी असे भाव आपल्यामधे कसे बाणवायचे त्याचे संसूचन व शिक्षण आम्हाला खांडेकर सहित्यात मिळते. निराशा, ठेपाळलेले असे कुरूप जीवन जगण्यापेक्षा हे जीवन माणसामधली भव्य-दिव्यता आतूनच जागवत व जोजवत राहते. अशा लोकांना दिलेल्या पुरस्काराचे मूल्य वाढते. खांडेकरांना आम्ही मोठे केले म्हणणारे व्यावसायिक, खांडेकरांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळताना, तसेच खुर्चीवर बसवून ठेवून ते घेण्याकरता पुढे राष्ट्रपतींकडे लगबगीने जात होते. पण राष्ट्रपतींना ज्ञानपीठ पुरस्कारासारख्या पुरस्काराची महत्ता माहिती होती. खांडेकर जिथे बसले होते तिथे जाऊन त्यांचा त्यांनी यथा-योग्य पद्धतीने सत्कार केला. अलंकार्य व्यक्तीलाच तो अलंकार द्यायचा असतो हे तत्त्व त्यांना माहिती होते. आम्ही लोक आमच्या दहा फूट उंचावलेल्या सुजेसारख्या अहंकारामुळे तो विसरून जातो.

माध्यमांमधे मोक्याच्या जागा मिळविल्या की सांस्कृतिकतेचे पांघरूण घेऊन, कुरघोडी करण्याची नव-नवीन तंत्रे कशी विकसित करता येतात ही मजेने पहात राहण्याची बाब आहे खरी; पण त्यामुळे समाजातले हिडीसपण ठळकपणे पुढे येते. खांडेकरांनंतर शिरवाडकरांना काही वर्षांनी ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आणि बरीच वर्षे मराठीला

ज्ञानपीठ नव्हते; तेव्हा एका गृहस्थांनी तिथपर्यंत जो छुपा प्रचार होता; तो प्रकटपणे मांडायला सुरुवात केली होती की, 'मराठी भाषेकरिता ज्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला ते त्या पुरस्कारासाठी योग्य नव्हते' ..... कारण .... सांगण्याची आवश्यकता नाही.

मी मनात म्हटले, सभ्य गृहस्था ! वरवर चमकदार बुद्धिमत्तेने युक्त अशी विधाने करणाऱ्या लोकांनी सामान्यजनांचे मत अशा गोबेल्स प्रचारामुळे वळवू शकू; या खात्रीपोटी केलेली ही अशी विधाने, दुष्ट हेतूने प्रेरित असतात हे आतापर्यंत लोक शिकलेले आहेत याची नोंद घे !

विष्णूजी खांडेकर आपणाला सविनयादर नमस्कार.

१) यापुढची नमस्कार-योग्य व्यक्ती
**पं. भास्करबुवा बखले**

२) नेहमीच पहा - www-thekarhaadaa.org

**अवधूत हर्डीकर**
१६ए, गणेशकृपा सोसायटी,
परमहंसनगर, पौड रोड,
पुणे ४११०३८